# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: approval@unipune.ac.in

संदर्भ : सीसीओ/२३७६

दिनांक : २९ ऑक्टोबर, २०१५

## परिपत्रक क्र.२४०/२०१५

विषय: **शिक्षक निवड समितीच्या सुधारित अहवालासंदर्भात....**

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, रिक्त शिक्षकी पदांवर नियुक्तीची शिफारस करण्यासाठी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांमध्ये निवड समितीची रचना ही विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या नियमाप्रमाणे करण्यात येते. तसेच स्थानिक निवड समितीचे गठन हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिनियम ४१५ नुसार करण्यात येते. रिक्त शिक्षकी पदे भरण्यासाठी निवड समितीमध्ये मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले सदस्य (सर्वसाधारण व आरक्षित) तसेच संबंधित विषयांचे तज्ज्ञ शिक्षक यांचा समावेश असतो. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीनुसार व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिनियमानुसार गठित केलेल्या समितीमध्ये विषयतज्ज्ञ असल्यामुळे संबंधित विषयतज्ज्ञांना महाविद्यालयाने / संस्थेने खालील बाबी निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे.

१) मुलाखतीस उपस्थित असलेला उमेदवार हा विद्यापीठ अनुदान आयोग/ ए. आय. सी. टी. ई./ एन. सी. टी. ई. / महाराष्ट्र शासन/ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार ज्या शिक्षक पदासाठी उमेदवाराने अर्ज केलेला आहे त्या पदास सदर उमेदवार पात्र आहे अथवा नाही.

२) ज्या पदासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेला ए.पी.आय. स्कोअर आवश्यक असल्यास त्याची पडताळणी करणे आवश्यक आहे.

३) जाहिरातीमध्ये ज्या आरक्षित प्रवर्गासाठी पदे दर्शविली असतील त्याप्रमाणे संबंधित आरक्षित प्रवर्गातील उमेदवारास बोलाविण्यात आले आहे अथवा नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिनियम ४१५ (२) (ई) नुसार निवड समितीने शिफारस केलेल्या प्रत्येक शिक्षक पदाच्या उमेदवारास मा. कुलगुरू यांची मान्यता घेणे बंधनकारक असल्याने अशा प्रकारची मान्यता दिल्यानंतरच महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम २ (३४) प्रमाणे सदर निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारास 'शिक्षक' या व्याख्येनुसार मान्यता देण्यात येते.

निवड समितीमध्ये मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले तज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांचा समावेश असल्याने व मा. कुलगुरू हे शिक्षक पदास मान्यता देत असल्याने मा. कुलगुरूंचे प्रतिनिधी म्हणून निवड समितीने शिफारस करताना 'शिक्षक मान्यता देण्यास शिफारस आहे' असा अभिप्राय समितीने देणे अत्यंत आवश्यक आहे व यापुढे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव या विभागात सादर करताना समितीने 'शिक्षक मान्यता देण्यास शिफारस आहे' असा अभिप्राय निवड समिती अहवालामध्ये नमूद करूनच प्रस्ताव सादर करावे. अन्यथा अशा प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

गणेशखिंड, पुणे-४११००७ )
जावक क्र. सीसीओ/२३७६ )
दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ )

संचालक
(म.वि.वि.मं.)

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :

मा. प्राचार्य / मा. सचिव
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था
पुणे / अहमदनगर / नाशिक